# पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण

आकुर्डी, पुणे-44, दुरध्वनी क्र.020-27652934 / 27652935,

फॅक्स : 020-27353670


PCNTDA
सेवा श्रद्धासमन्विता

जा.क्र.विप्रा/प्रशासन/206 दिनांक 28/06/2019

## जाहिरात

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण कार्यालयात कंत्राटी पध्दतीने विधी सल्लागार यांची नेमणूक करावयाची आहे. त्याकरिता विधी सल्लागारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या विधी सल्लागार पदाची अर्हता , पदाच्या कामाचे स्वरूप यांची माहिती खालीलप्रमाणे.

### अ) सर्वसाधारण सूचना

1. विधी सल्लागार या पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज सादर करण्याचा कालावधी दि. 01/ 07/ 2019 पासून 10/ 07/ 2019 रोजी सायंकाळी 5 : 45 पर्यंत आहे.
2. मुदतीत अर्ज करण्याऱ्या विधी सल्लागाराची दि.12 / 07/ 2019 रोजी सकाळी 11.00 वाजता 7 वा मजला पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण येथे मुलाखत घेण्यात येईल.
3. मुलाखतीस उपस्थित रहाण्याबाबत विधी सल्लागारास स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही.
4. मुलाखतीस उपस्थित न राहिल्यास निवडीसाठी विचार केला जाणार नाही.
5. निवड झालेल्या विधी सल्लागारास करार पध्दतीने नियुक्ती देताना 1 वर्षासाठी नियुक्ती देण्यात येईल.कामकाज व आवश्यकता विचारात घेऊन पुढील वर्षासाठी मुदतवाढ देण्यात येईल.
6. अपूर्ण अर्ज, स्वाक्षरी, फोटो नसलेले अर्ज अपात्र करण्यात येतील.
7. विधी सल्लागाराने स्वत:चे संपूर्ण नांव ( आडनांव प्रथम), जन्मदिनांक, वय, लिंग, स्त्री / पुरुष, पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसहीत) व मोबाईल क्रमांक, याबाबतचा तपशिल नमुद करुन सोबतच्या नमुन्यामध्ये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे-44 यांचे नावे अर्ज दि.10 / 07/ 2019 रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत पोहोचेल अशा रितीने पोस्टाने पाठवावा अथवा कार्यालयात समक्ष सादर करावा.

### ब) शैक्षणिक अर्हता व अनुभवाबाबतच्या अटी :-

1. विधी सल्लागार किमान मान्यता प्राप्त विधी शाखेची पदवी उत्तीर्ण असावा.
2. जिल्हा न्यायालयातील स्वतंत्र वकिलीचा किमान 10 वर्षाचा विशेषत: महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, प्रशासकीय व कामगार विषयक अधिनियमाच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक अथवा शासकीय / निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील न्यायालयीन कामाशी संबंधीत वर्ग 1 अथवा वर्ग 2 च्या पदावरील किमान 10 वर्षाचा अनुभव असणे आवश्यक
3. वय 64 वर्षापेक्षा जास्त नसावे.

**<u>क) इतर अटी व शर्ती :-</u>**

1. विधी सल्लागाराने कार्यालयात पूर्ण वेळ रहाणे बंधनकारक आहे.
2. प्राधिकरणातील सर्व विभागातील न्यायालयीन प्रकरणांची नोंद ठेवणे, न्यायालयीन प्रकरणामध्ये जिल्हा न्यायालय, मा. उच्च न्यायालय, मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये पॅरावाईज कॉमेंन्ट देणे, शपथपत्र दाखल करणे, न्यायालयीन प्रकरणांचा आढावा घेणे, न्यायालयीन प्रकरणांच्या सुनावणींची नोंद ठेवणे, सुनावणीसाठी न्यायालयात उपस्थित रहाणे अशी कायदेविषयक सर्व कामे करावी लागतील.
3. प्राधिकरणाच्या विविध विभागातील कायदेशीर बार्बीचा सल्ला देणे, न्यायालयीन प्रकरणाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी व विभाग प्रमुखांनी सांगितलेली कामकाज करणे आवश्यक राहील.
4. नियुक्त केलेल्या व्यक्तीकडून नियमित सेवेत घेण्याची अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.
5. कामकाज समाधानकारक नसेल अथवा इतर कोणत्याही कारणास्तव नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल.

**अर्जासोबत खालील प्रमाणपत्रे सांक्षाकित करुन जोडावीत.**

मान्यताप्राप्त विद्यापीठाची विधी शाखेची पदवी तसेच जिल्हा न्यायालयातील स्वतंत्र वकिलीचा किमान 10 वर्षाचा विशेषत: महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, प्रशासकीय व कामगार विषयक अधिनियमाच्या कामाचा अनुभव असलेल्या प्रमाणपत्राची सांक्षाकित प्रत.

**मुलाखत:-**

अर्ज सादर करणाऱ्या विधी सल्लागार यांनी दि. 12 / 07/ 2019 रोजी मुलाखतीस हजर रहावे.
मुलाखतीचे ठिकाण: 7 व मजला पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे.
मुलाखतीची वेळ: सकाळी 11.00 वाजता
मुलाखतीचे वेळी कागदपत्रांच्या मूळ प्रती सोबत आणाव्यात. मुलाखतीसाठी प्रवास खर्च दिला जाणार नाही.

**निवड प्रक्रियेबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असेल, व याबाबत कोणताही आक्षेप विचारात घेतला जाणार नाही.**

जाहिरात क्रमांक : 13 /2019
दिनांक : 29/06/2019

**सही/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पिंपरी चिंचवड नवनगर विकास**
**प्राधिकरण, आकुर्डी, पुणे- 411 044**

अर्जदाराचा स्वसाक्षांकित फोटो

प्रति,

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी

पिं.चिं. नवनगर विकास प्राधिकरण,

आकुर्डी, पुणे

**विषय:-** करार तत्वावर विधी सल्लागर यांची नियुक्ती करण्याबाबत.

**संदर्भ:-** आपली जाहिरात क्र. ----------------------------- दिनांक ---------------------

महोदय,

मी आपल्या कार्यालयात करार पध्दतीने विधी सल्लागार म्हणून कंत्राटी पध्दतीने काम करू इच्छितो/इच्छिते.

1) पूर्ण नाव (प्रथम आडनाव) :-

2) पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता :-

3) जन्मदिनांक :-

4) वय :-

5) स्त्री/पुरुष :-

6) अर्जदाराविरुध्द न्यायालयीन प्रकरण :-
चालू आहे काय ?

7) अर्जदारास शिक्षा झाली आहे काय ? :-

8) अर्जदाराची शैक्षणिक अर्हता :-

9) विधी सल्लागाराच्या कामाचा अनुभव
असलेले प्रमाणपत्रांचा तपशील :-

वरील माहितीच्या पुराव्यादाखल मी खालील साक्षांकित कागदपत्रे सोबत सादर करीत आहे. मूळ कागदपत्रे मुलाखतीच्या वेळी सादर करीन.

1) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे
2)
3)
4)

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, वरील सर्व माहिती सत्य आहे. ही माहिती चुकीची आढळून आल्यास होणाऱ्या कारवाईस मी जबाबदार राहीन,याची मला जाणीव आहे.

**अर्जदाराची स्वाक्षरी**